PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Sangate Aika
Year: 1959

Song: Are Are Nandacha Pora
Lyricist: Ga. Di. Madgulkar

अरे अरे नंदाच्या पोरा
आ वळीखलं की रं आपल्याला
का आलास हा सामोरा
रस्ता आडवायला
बारा घरच्या तरूणी बारा
आहा दिसत्यात बरं का
आम्ही निघालो रे बाजारा
आम्ही निघालो रे बाजारा
आ...
बारा घरच्या तरूणी बारा
आम्ही निघालो रे बाजारा
आम्ही निघालो रे बाजारा
अगं ये चाललात कुठं

नको वाकडा बोलू
नको आडवा चालू
नको धरूस हात
सोड माझा शालू
नको धरूस हात
सोड माझा शालू
अहं आता कुठला सोडतोय शालू
तुझ्या परीस मी अवखळ रे
मला म्हणतात चंद्रावळ
मला म्हणतात चंद्रावळ
अस होय...
क्रिष्णा बोल रं
अगं चंद्रावळी तुझं चंद्रबळ
मला आहे त्याची अटकळ
मऊ मेणाहून तू कोमळ

असं...
वरून दावतेस अशी गं फटकळ
मऊ मेणाहून तू कोमळ
वरून दावतेस अशी गं फटकळ
कुठं जाशी उन्हात
चल वृंदावनात
तुझ्या संगतीची आस
आहे माझ्या मनात
तुझ्या संगतीची आस
आहे माझ्या मनात
डोळा चुकवून काढशील पळ
गं...
डोळा चुकवून काढशील पळ
तुला घेरील वानर गं
तुला घेरील वानर गं
सांग आता
वानर अरे जा
याच बोलणं सपक गुळवणी
आं
काय ऐकता तुम्ही गवळणी
ठेवा मस्तकी माठ
चाला तोऱ्यात वाट
ठेवा मस्तकी माठ
चाला तोऱ्यात वाट
नका गमवू गं वेळ
जाईल ओसरून हाट
नका गमवू गं वेळ
जाईल ओसरून हाट
क्रिष्णा अरे निघाल्या की

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

Literacy for a Billion

आता उशीर कशाला
आ हा...
आ...
बाई यानं साधला गं दावा
बाई यानं साधला गं दावा
घुमू लागे मनोहर पावा
घुमू लागे मनोहर पावा
आता पायात कुठलं बळ
साऱ्या देहास भरला चळ
तुझ्या मुरलीने गळले बळ
मी गं कृष्णाची चंद्रावळ
तुझ्या मुरलीने गळले बळ
मी गं कृष्णाची चंद्रावळ

मी गं कृष्णाची चंद्रावळ

रूपयाचं आणं सारं सोळा
करी रस्त्यात भिकारी गोळा
आमच्या चिमाचा भाव आगळा
अहो आगळा
हो...

अहो बड्या गावचं पाटील आपण
काय भाव तुमच्या दौलतीचा
आणि नाव ठेविले सोनुबाई
हाती वाळा कथलाचा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*